Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-X Oct. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठी साहित्य

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग, प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय,नळेगाव

एकोणीशे साठ (1960) नंतरच्या मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक नवा जोमदार प्रवाह सुरू झालेला दिसतो. या साहित्याला (दलित) असे विशेषण किंवा जातीवाचक शब्द लागलेला आहे. या शब्दामुळे दलित साहित्याची प्रकृती कांही निराळी असावी असे वाटू लागले त्याचे वेगळेपण कशात आहे ते तपासले पाहिजे. दलित साहित्याच्या ज्या निरनिराळया व्याख्या केलेल्या आहेत त्या लक्षात घेऊ.

अ) दलित व दलित साहित्याच्या व्याख्या :-

1) सुप्रसिध्द दलित कवी व समीक्षक केशव मेश्राम म्हणतात - ''हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्याला दलित म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लोकांनी निर्माण केलेल्या साहित्याला 'दलित' साहित्य म्हटले पाहिजे.'' (महाबळेश्वरच्या साहित्यसंमेलनामध्ये एका परिसंवादात मांडलेला विचार)

2) श्री राजा ढाले यांनी दलित कोणाला म्हणावे यासंबंधीची कल्पना पुढीलप्रमाणे सवीस्तरपणे मांडलेली आहे त्यांच्यामते - ''दलित शब्दाची व्याख्या केवळ बौध्द, मागासवर्गीय नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत ते दलित असे मानल्याने दलितावर अन्याय होतो. दलित साहित्य म्हणजे दलित लेखकाने दलिताविषयी निर्मिलेले प्रक्षोभक विद्रोही साहित्य होय.''

3) श्री बाबूराव बागूल यांनी 'दलित साहित्यात' माणसामाणसाला केंद्र बिंदू मानते असे मत मांडलेले आहे.
श्री बाबूराव बागूल - ''दलित साहित्य हे माणसाला केंद्र बिंदू मानते.''

4) डॉ. वानखेडे यांनी 'दलित' शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे. ''दलित म्हणजे केवळ बौध्द व मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी ते सर्व दलित होय.''

5) डॉ. सदा कऱ्हाडे यांनी ही डॉ. वानखेडे यांच्याप्रमाणेच आपले मत मांडलेले आहेत. शरदचंद्र मुक्तिबोध हे सुप्रसिध्द कवी व समीक्षक आहेत यांच्या मते - ''दलित वाङ्मय म्हणजे दलितोध्दाराचे वाङमय नव्हे तर दलित जाणिवेतून दलित विषयक जे वाङमय निर्माण होते ते दलित साहित्य होय.''

त्यांच्या मते अस्पृश्यता, दास्य, विषमता व दुःख यांच्याशी वैर साधणारी जी जाणीव ती दलित जाणीव होय आणि ही जाणीव वैश्य, वर्ण किंवा जाती श्रेष्ठता यास कसून विरोध करणारी आहे.

6) डॉ. भालचंद्र फडके -''सर्व मागासवर्गीय जाती, सामाजिक अन्याय, दारिद्रय, अज्ञान इत्यादींनी त्रस्त झालेला दलित वर्ग आणि या वर्गाला रानटी, दुष्ट परंपरा, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, दैववादीपणा व गुलामगीरी या विरूध्द बंडाला उद्युक्त करणारी ती दलित जाणीव होय.'' आणि या जीवनाचे भेदक दर्शन घडविणारे साहित्य ते दलित साहित्य होय. प्रा. बाळकृष्ण कवठेकर हे दलित साहित्याचे एक अभ्यासक आहेत. 'दलित साहित्य: एक आकलन' या आपल्या ग्रंथात त्यांनी दलित साहित्याचा सर्वांगानी विचार केलेला आहे.

7) प्रा. बाळकृष्ण कवठेकर - हे दलित साहित्याचे एक अभ्यासक आहेत 'दलित साहित्य : एक आकलन' या ग्रंथात दलित साहित्याचा सर्वांगीण विचार केलेला आहे. ''दलित या शब्दाविषयी व त्याच्या व्युत्पत्तीविषयी अधिक विशुध्द व वस्तूनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारलेला आहे दलित या शब्दात सर्व पिडीत जातींचा समावेश गृहित धरावा असा जो विचार डॉ. वानखेडे यांनी मांडला तो प्रा. कवठेकर यांना मान्य नाही. उलट राजा ढाले यांच्या भूमीकेचे समर्थन करून ते

म्हणतात, ''जन्मजात दलितत्व ही कसोटीच मान्यता पावलेली आहे. असे असले तरी जन्माने दलित असलेल्या सर्व लेखकांना दलित असे विशेषण लागलेले नाही. उदा. कवी ग्रेस, माने, गोडघाटे याचा अर्थ असा जनमतः दलितत्व एवढीच कसोटी दलित साहित्याची नसून त्यांच्या जोडीने आणखीन कांही बाबी आवश्यक आहेत. जन्मतः दलित लेखकाची विद्रोह, नकार यांनी युक्त अशा दलित संवेदनांची अभिव्यक्ती करणारी साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.

ब) दलित साहित्याची प्रेरणा :-

वरील व्याख्यांचा विचार करून असे म्हणावे लागते की दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. त्यांनी हजारो वर्षापासून अन्याय सहन करणाऱ्या दलित समाजाला आत्मभानाचा नवा प्रकाश दाखवला एका प्रकाराच्या मिंधेपणातून, दास्यवृत्तीतून त्यांना जागे केले. त्यांच्या मनात स्वाभीमानाची किंवा अस्मितेची ज्योत पेटवली. अन्यायाचा धिक्कार करण्याचे सामर्थ्य दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला नसता तर दलित साहित्याचे काय झाले असते हा विचारच एक भयानक पोकळी निर्माण करणारा आहे. दलित विश्व दलित जाणिवा, दलित विचारसृष्टी यामागे डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आहे.

क) डॉ. आंबेडकरांचे तत्वज्ञान :-

डॉ. आंबेडकरांनी बुध्दिनिष्ठा आणि तर्कशुध्दता यास महत्व दिले आणि अंधश्रध्दा आणि व्यक्तीपूजा यांचा धिक्कार केला दलितांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृतीला व परंपरेला त्यांनी आव्हान दिले अन्यायाचा प्रतिकार व न्यायाची प्रतिष्ठापना हा त्यांच्या कार्याचा हेतू होय. मानवतेवर त्यांचे नितांत प्रेम होते. हजारो वर्ष तडफडून टाकलेल्या दलित समाजाला जागृत ज्ञान संपन्न आणि आशावादी बनून भेदरहित मानवता व समतास्थापने हे त्यांचे उद्दिष्ट होय. साहित्यिकांनी आणि संतानी या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी साहित्य निर्माण करावे आणि प्रत्यक्ष कृती उक्तीद्वारे साहय करावे असे डॉ. आंबेडकरांनी मानले. नकार, विद्रोह मानवतावाद या तत्वांना महत्व प्राप्त होऊन त्याचा अंगीकार दलितांनी करावा असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

1) नकार :- आजवर दलितावर ज्या समाजव्यवस्थेने दलितांना जनावराप्रमाणे वागवले त्या समाजव्यवस्थेला दलितांचा नकार आहे. हिंदू धर्मातील वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, धनीक सत्ता, गुलामगीरी, दडपशाही यास दलितांचा नकार आहे. एवढेच नाही तर वैदिक अथवा हिंदू संस्कृती, वैदिक अथवा भारतीय वाङमय किंबहुना पूर्ण हिंदू संस्कृतीला नकार आहे. प्राध्यापक केशव मेश्राम म्हणतात, ''जे माझ्यावर लादले आहेत ते ओझे आहे ते नाकारले पाहिजे, झुगारले पाहिजे'' हे देश सामाजिक पातळीवर घडावे तसेच ते कला व वाङ्मयीन पातळीवर घडते.

2) विद्रोह :- दलितांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेला नकार तर दिलेला आहेच पण त्याविरूध्द प्रवृत्त झालेले आहेत. सामाजिक पातळीवर हा विद्रोह घडलेला आहे त्याचा परिणाम वाङमयावर होणे अपरिहार्य आहे. वस्तुतः कोणतीही वाङमयीन कृती निर्माण होण्यासाठी अगोदर तिची वैचारिक शक्ती कारणीभूत ठरते. आजवरच्या वाङमयीन प्रवृत्तीचा इतिहास पाहिला तर लक्षात येते की, अगोदर विशिष्ट जीवनदृष्टी अथवा तत्वज्ञान वैचारिक पातळीवर मांडले जाते. नंतर सृजनशील लेखक तिचा साहित्य कृतीद्वारे अविष्कार घडवितो. दलित साहित्यातून प्रगट होणारी नवी दृष्टी व प्रवृत्ती वैचारीक पातळीवरून मांडण्याचे कार्य साहित्यिकांनी केलेले आहे. समाज सुधारणावादी लेखकांचे बौध्द वाङ्मय पूर्वगामी वाङ्मय, केशवसुतांनी निर्मिलेले मराठी वाङमय यांना जे महत्वाचे स्थान आहे तेच महत्वाचे स्थान दलित साहित्यालाही आहे. 1948 साली डॉ. आंबेडकरांनी विद्रोहाची भाषा पुढील शब्दात केलेली आहे. ''आम्ही नम्र भावनेने व अधोवदनाने जे कांही मागावयाचे ते मागत नाही असा आमच्यावर आक्षेप आहे अस्पृश्याइतका लाचार अमल दुनियेत कोण आहे पाषाणालाही पाझर फोडणाऱ्या दीन अवस्थेतच आम्ही दिवस नाही का काढले? आतातरी कृपा करून नम्रतेचे व विनियाचे घोट देऊ नका.'' डॉ. भालचंद्र फडके यांच्या मते ''दलित लेखकांना नवा माणूस अभिप्रेत आहे

म्हणून त्यांची भाषा विद्रोहाची आहे. विद्रोह हा मूल्यांच्या स्थापनेसाठी असतो एक मूल्यसमूह नाकारून दुसरा मुल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार असतो. म्हणूनच विद्रोह आणि मूल्य यांचा घनिष्ठ संबंध आहे प्रतिगामी वृत्ती, अन्यायव द्वेष ज्या जगात वाढत जातो तेथेच विद्रोहाचा जन्म होतो.'' डॉ. आंबेडकरांनी जाणीवपूर्वक ही विद्रोहाची भूमिका स्वीकारलेली होती. त्यांना तुच्छता मुक्त अशी समाजरचना हवी होती आणि हीच प्रेरणा दलित लेखकांच्या लेखनामागे आहे एवढेच नव्हे तर या विद्रोही दलित साहित्याने समाज परिवर्तन हे आपले प्रयोजन मानलेले आहे. प्राध्यापक रा.ग.जाधव यांच्या मते, विद्रोहाची संकल्पना आधुनिक आहे. त्यांनी आपल्या 'निळी पहाट' या ग्रंथात पुढील विचार मांडला आहे. ''विद्रोहाच्या संकल्पनेच्या बुडाशी पीडक-पिडीत यांचे द्वंद्व आहे. या प्रकारचे द्वंद्व उभय (दोन्ही) वर्गाला फलदायक आहे. विद्रोहाचे स्वरूप व्यक्तीपरत्वे कमी अधिक असते. विद्रोहाची चळवळ ही सामाजिक क्रांतीसारखी व्यापक शिघ्र कृती नसते. पिडीत वर्गाला आपला कोंडमारा होतो आहे. याची जाणीव होते. आणि तो त्यातून मुक्त होण्यासाठी कांही उपाय शोधत असते हीच विद्रोहाची चळवळ होय.'' समाजव्यवस्था मानवनिर्मित आहे म्हणून ती बदलण्याचा अधिकार मानवाला आहे. या अविचल निष्ठेतून विद्रोह ही चळवळ रूपास येते. विद्रोहाची परंपरा महात्मा फूले, गोपाळ गणेश आगरकर, अण्णासाहेब कर्वे, डॉ. आंबेडकर अशी आहे. दलित साहित्यिकांनी हिंदू वाङमयाला व परंपराना नकार देऊन त्याविरूध्द विद्रोह केलेला आहे. प्राध्यापक रा.ग.जाधव यांना दलितांचा हा नकार मान्य असला तरी दलितांनी कोणत्या नव्या परंपरा किंवा वाङ्मय निर्माण केले पाहिजे याचा विचार करणे आवश्यक वाटते दलितांना जे जे प्रस्थापित आहे त्याविरूध्द विद्रोह केलेला आहे. त्यातून त्यांना नवा माणूस घडवायचा आहे.

ड) आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद :-

दलितातील कांही लेखकांनी मार्क्सवादाची प्रेरणा घेऊन साहित्य निर्मिती केलेली आहे. उदा. बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ, आंबेडकरवाद्यांनी मार्क्सवादाचा स्वीकार करावा का नाही याबद्दल वाद उपस्थित झाला होता खुद्द आंबेडकरांना मार्क्सवादातील अर्थाधिष्ठीत दृष्टी व धर्मविरोध आणि लोकशाही विरोध या बाबी डॉ. आंबेडकरांना पटत नव्हते. दलितांना केवळ आर्थिक समृध्दी प्राप्त करून देणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट नव्हते तर त्यांना माणूस म्हणून जगण्याचा नाकरला गेलेला हक्क मिळवून देणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. दलितांचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसून तो मूलतः सांस्कृतिक आणि सामाजिक स्वरूपाचा आहे. त्याचे उत्तर मार्क्सवाद देऊ शकणार नाही. आंबेडकरांनी ओळखले होते अर्थाशिवाय बाकीच्या सर्व मूल्यांना निरर्थक मानणाऱ्या व साहित्य, कलाना हुकूमाचे ताबेदार करणारा मार्क्सवाद डॉ. आंबेडकरांना उपकारक वाटला नाही. मार्क्सवाद प्रणीत समाजवाद व्यवस्था भाकरीचा प्रश्न सोडविला. पण माणूस म्हणून मानाने जगण्याचा प्रश्न उरतोच हे डॉ. आंबेडकरांनी ओळखलेले होते.

ढ) दलित साहित्याची बांधिलकी :-

दलित साहित्याची बांधिलकी विशिष्ट व्यक्तीशी नाही ती माणसाला श्रेष्ठ मानणाऱ्या विचारांशी आहे. बांधिलकी म्हणजे आचार विचारांच्या अनेक पर्यायातून व्यक्ती एक नैतिक निर्णय घेतलेला असतो व त्यानुसार त्याला कृती करायची असते. ही त्या समाजाची बांधिलकी आहे. दलित साहित्याची बांधीलकी मुलभूत व शाश्वत अशा जीवन मूल्यांशी आहे. स्वातंत्र्य हे त्यातले एक मूल्य आहे. वर्णव्यवस्थेमूळे व जातीव्यवस्थेमुळे माणसाचे स्वातंत्र्य हरवते. म्हणूनच दलित साहित्य मानवी स्वातंत्र्याची बांधीलकी स्वीकारते स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय ही मूल्य दलित मूल्य दलित साहित्याला श्रेष्ठ वाटतात.

च) दलित साहित्य व दलित चळवळ :-

दलित साहित्य व दलित चळवळ हे दोन नाहीत असे एकमत मांडले जाते. असे मानले तर दलित जीवन यांचा अतूट असा संबंध आहे. असे मानले तर दलित साहित्याच्या वाङ्मयीन विचारामध्ये अडचणी निर्माण

होतात असे प्राध्यापक कवठेकरांचे मत आहे. दलित संवेदना, दलित लढयाशी निगडीत झाली पाहिजे तरच त्या संवेदनेतून निर्माण होणारे अविष्कार करणारा ठरेल अशीच एक भूमिका मांडली जाते तिला विरोध करताना प्राध्यापक कवठेकर यांनी हे स्पष्ट केले की, ही भूमिका दलित साहित्याचे अंतीम हीत साधणारे नाही. चळवळीच्या दृष्टीने ही वैचारीक बांधीलकी म्हणजे एक गौरवास्पद जीवन आहे पण कलेच्या क्षेत्रातही वैचारीक बांधीलकी झापडामध्ये रूपांतरीत होते. अशी वैचारीक बांधिलकी पत्करणारे लोकजीवन आहे. तसे पाहण्याऐवजी जीवन कसे असावे यासंबंधीचे मत मांडू पाहतात म्हणून जीवनाचे खरेखुरे आकलन त्यांना होऊ शकत नाही. पुरोगामी साहित्याचे हेच झालेले आहे. अशी वैचारिक भुमिका बांधीलकीमधून स्वीकारणे याचाच अर्थ लेखकांच्या स्वातंत्र्याचा संकोच आहे. अशी बांधीलकी स्वीकारल्याने वैचारीक चळवळीचे हे एक साधन बनते व दलित साहित्याच्या दृष्टिने ही घातक गोष्ट आहे. म्हणून दलित संवेदना दलित चळवळीशी समांतर ठेवण्याऐवजी ती चळवळीशी समांतर राहणेच हितकारक आहे.

छ) दलित साहित्यातील बंडखोरी :-

सामाजिक बांधिलकीच्या भूमीकेबरोबरच आणखी एका भूमीकेचा विचार करणे आवश्यक आहे. ती भुमिका अशी दलित साहित्य जीवननीष्ठ आहे, प्रयोग निष्ठ नाही. तंत्रवाद, अन्य वाङ्मयीन संकल्पना या विरूध्द बंड करणाऱ्या वाङमयापेक्षा ते निराळे आहे. दलितांच्या पददलित व अभावग्रस्त जीवनाचे दर्शन घडविणारे दलित वाङमय बंडखोर आहे. पण ही बंडखोरी दलितांच्या विदारक अनुभवामुळे जाणवणारी आहे. नवा सांस्कृतिक जीवन संस्कार करणे हे दलित साहित्याचे उद्दिष्ट आहे माणसाच्या न्यायाच्या व हक्काच्या मूल्यांचा कलाकृतीतून अविष्कार करणे हाच दलित साहित्याचा हेतू आहे आणि हाच जीवनवाद आहे. दलितांनी मांडलेल्या भूमिकेचा व कांही दलितेतर मराठी समीक्षकाने उत्सवाने स्वागत केलेल्या या भूमिकेच्या काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक आहे. हे मान्य करता येईल की दलित साहित्य प्रत्येक जीवनातून निर्माण झाले असून ते जीवननिष्ठ आहे. परंतु ती जीवननिष्ठा दलित साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण होऊ शकत नाही. जीवननिष्ठा हे जर व्यवच्छेदक लक्षण मानले तर हरिभाऊंच्या कादंबऱ्या ही याच भूमिकेत बसते. जीवननिष्ठा हा अनेक गुणविशेषणांपैकी एक गुण विशेष आहे असे फार तर म्हणता येईल. जीवन निष्ठेला व्यवच्छेदक लक्षण मानले तर साहित्यात बोधवाद अथवा प्रचारवाद अवतरू लागेल. नव्हे दलित कवितेत तो अवतरलेला आहे. या बोधवादाशी ही जीवननीष्ठा बांधील आहे. ही बाब मराठी साहित्यातील जीवनवादाशी सुसंगत असला तरी खऱ्या खुऱ्या जीवनवादापासून ती दूर जाणारीच आहे. कारण वाङ्मयातील जीवनवाद म्हणजे वाङमयाबाहेरील कोणत्यातरी विचारसरणीचे दास्य पत्करणे होय. वस्तुतः कवीने अथवा कलावंताने जीवनाचा अनुभव घेत असताना त्यांच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन अबाधीत ठेवण्याचे स्वातंत्र्य हे जीवनवादाचे प्रमुख वैशिष्टय होय.

जीवनानुभवातील बंडखोरी अपरिहार्यपणे साहित्यात येणे व विचारांना पटलेली बंडखोरी जीवनानुभवावर लादने या दोन भिन्न गोष्टी आहेत. पैकी पहिली बंडखोरी अपरिहार्यपणेच जीवननिष्ठ साहित्यातील ही एक सहज प्रक्रिया होय. पण दुसरी मात्र जीवनानुभवाची आपल्याला हवी तशी कृत्रीम मांडामांड खरी आणि या दुसऱ्या प्रकारामुळे साहित्य हे निर्जीव होत जाईल. प्राध्यापक कवठेकराच्या मते - दलित साहित्यीकांनी ही गोष्ट लक्षात घेऊन आपली भूमिका स्वच्छ करून घेतली पाहिजे दलित साहित्य जीवननीष्ठ असल्याने अन्य श्रेष्ठ साहित्यकृतीप्रमाणेच श्रेष्ठ दलित साहित्यात फार मोलाची भर घातली आहे. हे मान्यच केले पाहिजे. मर्यादित अनुभव विश्वात वावरणाऱ्या मराठी साहित्याच्या कक्षा समर्थपणे रूंदावल्या आहेत. हजारो वर्षापासून गावकुसाबाहेर राहणाऱ्या हीन अवस्थेत ठेवल्या गेलेल्या एका प्रचंड समाजाच्या दुःख, दैन्य, वेदना, उद्वेग, क्रोध व कारूण्य इत्यादी युक्त असलेल्या जीवनानुभवाचा जीवंत प्रवाह मराठी साहित्यात आणणाऱ्यांचे महनीय कार्य दलित साहित्याने केले आहे. नामदेव ढसाळ यांचे मत - सुप्रसिध्द दलित कवी श्री नामदेव ढसाळ यांनी दलित साहित्याच्या संदर्भात अत्यंत मोलाचा विचार मांडले आहे. त्यांनी

हे स्पष्ट केले आहे की, आपण ज्या समाजव्यवस्थेकडून दुःखी, दरिद्री, अज्ञानी व पिडीत झालो त्या व्यवस्थेला नाकारलेच पाहिजे व त्याविरूध्द विद्रोह केलाच पाहिजे. पण याबरोबरच ढसाळांनी पुढील इशारा देत म्हटले आहे की ''साहित्य मूल्याच्या गोष्टी किंवा कलात्मक जाणिवांच्या गोष्टी वाऱ्यावर सोडून देणे हे आपण (दलित साहित्यीकांनी) अनिष्ठपणाचे लक्षण मानले पाहिजे. बांधिलकीचा उरसफोड करून आपण आपल्यातल्या उस्फूर्त स्वाभाविक अविष्काराला पायबंद घालून बंदिस्त करू इच्छितो हे रास्त नाही. साहित्य हे सृजनशील प्रतिभेचा अविष्कार असतो याची जाण ठवेली पाहिजे.

निष्कर्ष :-

1) 1960 नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक नवा जोमदार प्रवाह मिसळून मराठी साहित्य समृध्द बनले.
2) दलित संवेदनाची अभिव्यक्ती करणारे साहित्य म्हणजे दलित साहित्य होय.
3) दलित विश्व, दलत जाणिवा, दलित विचार सृष्टी यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा आहे.
4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्दिनिष्ठा आणि तर्कशुध्दता यास महत्व दिले.
5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीनकार, विद्रोह, बंड, मानवतावाद व समता स्थापन करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते.
6) विद्रोही दलित साहित्याने समाज परिवर्तन हे आपले प्रयोजन मानले.
7) दलित साहित्यीकांना एक नवा माणूस घडवायचा आहे.
8) दलितांचा प्रश्न केवळ आर्थिक नसून तो मूलतः सांस्कृतिक आणि सामाजिक स्वरूपाचा आहे.
9) मार्क्सवाद प्रणीत समाजवाद व्यवस्था भाकरीचा प्रश्न सोडविल पण माणूस म्हणून मानाने जगण्याचा प्रश्न उरतो हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले होते.
10) साहित्य हे सृजनशील प्रतिमेचा अविष्कार असतो त्याची जाण ठेवणे आवश्यक आहे.

संदर्भग्रंथ :-

1) कृ.बा.मराठे, मराठी रंगभूमीचा पूर्वरंग, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1979
2) डॉ. शिवदास शिरसाठ, दलित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाटयविश्व, कैलास पब्लिकेशन, औरगांबाद, प्रथमावृत्ती, 2009
3) डॉ. बबन भाग्यवंत, दलित रंगभूमी आणि नाटक, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2008
4) डॉ. कृष्णा किरवले, दलित चळवळ आणि साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1996
5) मोतीराम कटारे, फुले आंबेडकरी साहित्य : साहित्य आकलन आणि आस्वाद, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2006
6) (संपादक) प्रा. यादव गायकवाड/डॉ. पृथ्वीराज तौर, नाटयवैभव, संस्कार भारती, लातूर, पृथमावृत्ती 2009.
7) भालचंद्र फडके, दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृथमावृत्ती, 1977
8) डॉ. योगेंद्र मेश्राम, 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास' श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 1998

www aiirjournal.com